॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
ज्ञान हेच खरे
संपत्तीचा खजिना आहे.




■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २७ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ४३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### सीबीएसई शाळा ९ जून तर राज्य मंडळाच्या शाळा १६ जूनपासून

● **पुणे** – राज्यामध्ये लवकरच शाळांच्या घंटा वाजणार असून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या(सीबीएसई) शाळा ९ जून पासून सुरू होणार आहेत. तर राज्य मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहे. नवीन शैक्षणिक वर्षासाठी पालक, विद्यार्थी आणि शिक्षक वर्गांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. उन्हाळ्याच्या सुटीनंतर पुन्हा एकदा शाळेच्या वातावरणात परतण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी सुरु झाली आहे. अनेक शाळांनी आधीच प्रवेश प्रक्रिया, पुस्तकांचे वाटप आणि नव्या शैक्षणिक वर्षाच्या योजनांचे काम पूर्ण केले आहे. पालकही मुलांच्या शाळेसाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यात गुंतले आहेत. राज्यातील विविध भागांतील हवामान व उष्णतेची तीव्रता लक्षात घेऊन शाळा सुरू होण्याच्या तारखांमध्ये फरक ठेवण्यात आला आहे. सीबीएसईच्या शाळा बहुतेक शहरी भागात असतात आणि त्यांच्या वेळापत्रकानुसार नवीन शैक्षणिक वर्ष लवकर सुरू होते. राज्य मंडळाच्या शाळा मुख्यत: ग्रामीण भागात आणि जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात असल्यामुळे त्या थोड्या उशिराने सुरू होणार आहेत. दरम्यान, अनेक शाळांमध्ये नवीन अभ्यासक्रम, उपक्रम व तांत्रिक सुविधा लागू करण्याचे काम देखील चालू आहे.

### १२ दिवस आधीच मान्सूनचे महाराष्ट्रात आगमन

● **पुणे** – यंदा तब्बल १२दिवस आधीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाल्यानं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आनंदाचं वातावरण आहे. मान्सून केरळमध्ये शनिवारी दाखल झाला होता, आज महाराष्ट्रात आगमन झाले आहे. त्यानंतर मान्सून महाराष्ट्रात पोहोचण्यासाठी एक ते दोन दिवस जातील, असा अंदाज होता. मात्र मान्सूनसाठी अत्यंत पोषक स्थिती असल्याने अवघ्या काही तासांमध्ये मान्सून राज्यात दाखल झाला. काही वेळात हवामान याबाबतची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. मान्सूनचे आगमन झाल्यानं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालाय. राज्यातील बहुतांश शेतकरी हे खरिपाच्या शेतीसाठी मान्सूनच्या पावसावर अवलंबून असतात. दरवर्षी मान्सून साधारणपणे ७ जूनच्या आसपास राज्यात दाखल होत असतो.

# सरकारी कार्यालयांत त्रिभाषा सूत्र

## तिन्ही भाषा बंधनकारक । सर्व कार्यालयांत मराठीचा वापर व्हावा

● **मुंबई । वीरभूमी–**
राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत हिंदी, इंग्रजीसह मराठीचा वापर करणे बंधनकारक असल्याचा आदेश राज्य सरकारने काढला. या संबंधी सरकारने परिपत्रक जारी केले. शासनाच्या या निर्णयाच्या काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे असणार आहे, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.




केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील सर्व कार्यालयात मराठीचा वापर करण्यात यावा. त्यासंबंधी संबंधित कार्यालयांनी दर्शनी ठिकाणी सूचनाफलकावर तसे स्वयंघोषणापत्र लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील राष्ट्रीय बँका, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनो-रेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम इत्यादी सेवा पुरविणारी कार्यालये, केंद्र शासनाची अन्य कार्यालये आदी ठिकाणी त्रिभाषा सूत्रानुसार कार्यवाही होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने हा आदेश काढला.

केंद्र आणि राज्य सरकारच्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यात येतो किंवा कसे, याबाबत पडताळणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिका-यांवर असेल. तसेच याबाबतचे स्वयंघोषणापत्र संबंधित कार्यालयाकडून विहित नमुन्यात जिल्हाधिकारी घेणार आहेत. राज्यातील अनेक बँकांमध्ये, खासकरून मुंबई, ठाणे परिसरातील सार्वजनिक बँकामध्ये मराठीचा वापर केला जात नसल्याच्या अनेक तक्रारी झाल्या आहेत. मुंबई आणि ठाण्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये ग्राहकांना ही अडचण येत आहे. आता सरकारच्या नव्या आदेशानुसार या बँकांमध्येही मराठीचा वापर करणे बंधनकारक आहे.

### मराठी भाषा वापराबाबत जागरुकता निर्माण करावी

■ जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा स्तरावर पालकमंत्री किंवा लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकांना संबंधित केंद्र शासनाच्या कार्यालयातील प्रमुखांना आमंत्रित करून त्रिभाषी सूत्रानुसार मराठी भाषेच्या वापराबाबत त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करावी, असे राज्य सरकारने आदेशात म्हटले आहे.

# पंजाब किंग्सची टॉप २ मध्ये धडक

● **जयपूर । वीरभूमी–**
श्रेयस अय्यर याच्या नेतृत्वात पंजाब किंग्सने आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ६९ व्या सामन्यात मुंबई इंडियन्सवर ७ विकेट्सने मात करत टॉप २ मध्ये धडक दिली आहे. पंजाबने या विजयासह क्वालिफायर १ चे तिकीट मिळवले आहे. मुंबईने पंजाबला विजयासाठी १८५ धावांचे आव्हान दिले होते.

पंजाबने हे आव्हान ९ बॉल राखून पूर्ण केले. पंजाबने १८.३ ओव्हरमध्ये ३ विकेट्स गमावून १८७ धावा केल्या. पंजाबने या विजयासह साखळी फेरीतील शेवट विजयाने केला. तर मुंबईने टॉप २ मध्ये पोहचण्याची संध गमावली.

जयपूरच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्जच्या संघाने मुंबई इंडियन्सच्या विरुद्धच्या सामन्यात एकतर्फी विजयासह प्लेऑफ्समधील अव्वल दोनमधील आपलं स्थान निश्चित केले आहे. ११ वर्षानंतर प्लेऑफ्समध्ये एन्ट्री मारणाऱ्या पंजाबच्या संघ क्वालिफायर १ मध्ये खेळणार हे या सामन्याच्या निकालानं फिक्स झाले आहे.

दुसरीकडे या सामन्यातील पराभवामुळे पहिल्या दोनमध्ये पोहचण्याची मुंबई इंडियन्सची संधी हुकली आहे. आता मुंबई इंडियन्सचा संघ प्लेऑफ्सच्या लढतीत एलिमिनेटरचा सामना खेळताना दिसेल. संघाने चालू हंगामात पॉइंट्स टेबलच्या टॉप-२ मध्ये स्थान निश्चित केले आहे. सध्या, संघ १९ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

# यापुढे सुनांचा छळ करणाऱ्या कुटुंबीयांवर बहिष्कार

## मराठा समाजाचा ऐतिहासिक निर्णय

● **पुणे । वीरभूमी–**
पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणामुळे समाजमन हादरून गेले असून याच घटनेच्या पार्श्वभूमीवर पुण्यात मराठा समाजाच्या वतीने एक महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत लग्नकार्यांमध्ये चालू असलेल्या अनिष्ट चालीरीतींना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने ठोस निर्णय घेण्यात आले.

पुणे शहर आणि जिल्ह्यातील मराठा समाजातील प्रतिष्ठित मंडळींनी एकत्र येत एक बैठक घेतली. आणि या बैठकीत काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मराठा समाजाचे प्रतिनिधित्व करणारे श्रीकांत शिरोळे यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, वैष्णवीसारख्या मुलींना भोगावा लागणारा छळ थांबवण्यासाठी समाजातील प्रतिष्ठित लोकांची एक विशेष समिती स्थापन केली जाणार आहे. ही समिती लग्नांमधील अनावश्यक खर्च, हुंडा प्रथा आणि मुलींवरील छळ थांबवण्यासाठी मार्गदर्शन करेल आणि उपाययोजना राबवेल.

अरविंद शिंदे यांनी बोलताना सांगितले की, आज झालेल्या या बैठकीनंतर अनेकांनी स्वत:च्या घरापासूनच या बदलाची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. साधेपणाने लग्न करणे, फाजील खर्च टाळणे आणि अशा प्रकारच्या हुंड्याच्या मागण्या न करणे हे ठरवण्यात आले आहे. तसेच, ज्या कुटुंबांमध्ये मुलींचा छळ होईल, त्यांच्याशी 'रोटी-बेटी'चा व्यवहार बंद करण्याचा ठराव देखील यावेळी झाला.

चेतन तुपे यांनी सांगितले की, वैष्णवीप्रमाणे जर कोणत्याही मुलीवर हुंड्यासाठी छळ झाला तर त्या प्रवृत्तीवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात येईल. समाजात स्पष्ट संदेश जाईल की अशा प्रकारचे वर्तन सहन केले जाणार नाही. ही बैठक म्हणजे मराठा समाजात सामाजिक शुद्धीकरणाची सुरूवात मानली जात आहे. विवाहसंस्थेतील अनिष्ट प्रथांना छेद देत समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी हा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे. या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी समाजातील प्रत्येक कुटुंबाने जबाबदारीने पाऊल उचलणे अपेक्षित आहे.

# धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर कंटेनरने ७ तरुणांना चिरडले

● **गेवराई । वीरभूमी–**
महामार्गाच्या दुभाजकात अडकलेली गाडी काढत असताना भरधाव कंटेनरने सात तरुणांना चिरडल्याने मोठा अपघात झाला आहे. या दुर्घटनेत गेवराई शहरातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला. हा भीषण अपघात गेवराई शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गढीच्या उड्डाणपुलावर सोमवारी मध्यरात्री उशिरा घडला. या अपघातामुळे गेवराईत सर्वत्र शोककळा पसरली आहे.

दरम्यान, गढीच्या उड्डाणपुलावर अपघात घडल्याची माहिती मिळतात घटनास्थळी अनेकांनी धाव घेतली होती. मात्र सहा तरुण जागीच मृत्युमुखी पडल्याने त्यांना मदतकार्य करता आले नाही. यानंतर सहा जणांचे मृतदेह रुग्णवाहिकेतून शहरातील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. यानंतर याठिकाणी शहरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी सर्वचजण या दुर्दैवी घटनेविषयी हळहळ व्यक्त करत होते.

बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा या अपघातात मृत्यू झाला आहे. एका गंभीर जखमी व्यक्तीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सहा जणांच्या अपघाती निधनाने गेवराईवर शोककळा पसरली आहे.

वास्तविक रविवारी रात्री मध्यरात्री धुळे-सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी येथील कारखान्यासमोर बाळासाहेब आतकरे यांची कार डिव्हायडरवर आदळून किरकोळ अपघात झाला होता. या अपघातात कुणीही जखमी झाले नव्हते. मात्र, डिव्हायडरमध्ये अडकलेली ही गाडी बाहेर काढण्यासाठी बाळासाहेब आतकरे आणि त्यांचे काही सहकारी सोमवारी रात्री उशिरा घटनास्थळी आले होते. यानंतर दुभाजकात अडकलेली गाडी काढत असतानाच अचानक भरधाव वेगात आलेल्या आयशर ट्रकने त्यांना जबर धडक दिली. या भीषण धडकेत बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. मात्र या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण गेवराई तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# पावसामुळे मुंबईची दैना, भुयारी मेट्रो स्थानकात घुसले पाणी

● **मुंबई । वीरभूमी–**
अपेक्षेपेक्षा दोन आठवडे आधीच महाराष्ट्रात पोचलेल्या मान्सूनने मुंबईसह अनेक जिल्ह्यांत अक्षरश: दाणादाण उडवून दिली. सर्वत्र आभाळ फाटल्याचे चित्र आहे. मुंबई, ठाणे, रायगडसह संपूर्ण कोकणात, तसेच पुणे, सोलापूर, साता-यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार पाऊस झाला. मुंबईत तर तब्बल १०७ वर्षांनंतर मे महिन्यात एवढा विक्रमी पाऊस झाला. मुंबईत २९४ मिमी पाऊस कोसळल्याने कुलाब्यापासून संपूर्ण मुंबई जलमय झाली. नव्याने सुरू झालेल्या मेट्रो स्थानकांतही पाणी घुसले. तसेच ट्रॅकवर पाणी साठल्याने रेल्वेसेवाही ठप्प झाली. रस्ते वाहतूकही खोळंबली. त्यामुळे मुंबईची अक्षरश: दैना झाली.

मान्सूनचे केरळात १ जूनला तर मुंबईत १० जूनपर्यंत आगमन होईल अशी अपेक्षा होती. परंतु अनुकूल वातावरणीय परिस्थितीमुळे आठ दिवस आधीच मान्सूनचे शनिवारी केरळात आगमन झाले व अवघ्या २४ तासात शब्दश: वा-याच्या वेगाने मान्सून महाराष्ट्रात पोचला. दोन आठवडे आधीच मान्सून मुंबईत दाखल झाल्याने मुंबईची अक्षरश: दाणादाण उडाली. भायखळा, वरळी, लालबाग, परळ, दादर, सायन, कुर्ला, चेंबूर, सांताक्रूझ भागात मोठ्या पाणी तुंबल्याने रस्ते वाहतूक ठप्प झाली, तर रेल्वे वाहतूक विस्कळित झाली होती. नव्याने सुरू झालेली भूमिगत मेट्रो सेवाही स्थानकात पाणी घुसल्याने बंद करावी लागली. पहिल्याच पावसाने मुंबईची दैना झाल्याने सरकारच्या दाव्यांची पोलखोल झाली असून, त्यांना आरोपांच्या अतिवृष्टीला समोरे जावे लागत आहे.

यापूर्वी १९१८ साली मुंबईत २७९ मिमी पावसाची नोंद झाली होती. तो विक्रम रात्रीपासून कोसळणा-या पावसाने मोडला. मुंबईत सोमवारी सकाळपर्यंत २९४ मिमी पावसाची नोंद झाली होती. नरिमन पॉइंट परिसरात गेल्या २४ तासांत तब्बल २५२ मिमी पावसाची नोंद झाली. हीच परिस्थिती मध्य मुंबई, मुंबई उपनगर व शेजारील ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यात होती. पुणे जिल्ह्यातील बारामती,दौंड परिसरातही प्रचंड पाऊस झाला. पावसाने थैमान घातल्याने अनेक जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली होती.



पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई आणि एमएमआर या भागात अतिवृष्टी झाली आहे. दौंडमध्ये ११७ मि.मी., बारामतीत १०४.७५ मि.मी., इंदापुरात ६३.२५ मि.मी. इतका पाऊस झाला. बारामतीत २५ घरांशी अंशत: पडझड झाली असून पुरात अडकलेल्या ७ जणांना वाचविण्यात आले. ७० ते ८० कुटुंबांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले. फलटणमध्ये १६३.५ मि.मी. इतका पाऊस झाला. एनडीआरएफची एक चमू फलटणमध्ये आहे. ३० नागरिक दुधेबावी गावाशेजारी अडकले होते. त्यांना निवास आणि भोजनाची सुविधा पुरविण्यात आली. सोलापूरमध्ये ६७.७५ मि.मी. पाऊस झाला. माळशिरस तालुक्यात ६ नागरिक पुरात अडकले होते, त्यांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. पंढरपूर येथे भीमा नदी पात्रात ३ जण अडकले, त्यांचे बचावकार्य सुरु असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रविवारी रात्रीपासून कोसळणाऱ्या पावसामुळे मुंबईतील अनेक भागात पाणी साचल्याने रस्ते, रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. तिन्ही मार्गावरील उपनगरीय रेल्वेसेवा विस्कळित झाली होती. दृश्यमानता कमी असल्याने विमानसेवेवरही परिणाम झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोनच दिवसांपूर्वी मुंबई तुंबणार नाही, अशी ग्वाही दिली होती. पण पहिल्याच पावसाने नालेसफाईच्या कामाची पोलखोल केली.

रविवारी रात्रीपासून कोसळणाऱ्या पावसाचा फटका राज्याचे प्रशासकीय मुख्यालय असणाऱ्या मंत्रालयाला देखील बसला. आठवडयाच्या पहिल्याच दिवशी कामावर येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना सकाळी गुडघाभर पाण्यातून मंत्रालय प्रवेशासाठी वाट काढावी लागली. मंत्रालयाच्या गार्डन गेट, आरसा गेट येथे चांगलेच पाणी साचले होते. पावसाची शक्यता लक्षात घेऊन मंत्रालय तसेच इतर शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना सोमवारी संध्याकाळी चार वाजताच लवकर घरी जाण्याची मुभा देण्यात आली.

### आपत्ती व्यवस्थापन केंद्र २४ तास सुरू ठेवा : शिंदे

■ राज्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असून विशेषत: मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रात पुढील काही तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, नाशिक जिल्हाधिकारी त्याचप्रमाणे ठाणे, मुंबई महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करून मदत कार्याबाबत विविध सूचना दिल्या.या सर्व जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन केंद्रे २४ तास सुरू राहतील हे पहावे. तसेच अधिका-यांनी अतिशय काळजीपूर्वक आणि दक्ष राहून काम करावे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊ नये आणि कोणतीही जीवित किंवा वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळेवर आणि प्रभावी पावले उचलावी असे शिंदे यांनी सांगितले.

## SPOT NEWS



## अगस्तिच्या १३ कर्मचाऱ्यांचा १ जून रोजी सेवानिवृत्ती सोहळा

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्याची कामधेनू असलेल्या अगस्ति सहकारी साखर कारखान्यामध्ये विविध विभागात आपली दीर्घकाळ सेवा देणारे १३ शिलेदार हे ३१ मे २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहे, असे  यामध्ये खंडू काशिनाथ आवारी( शेतकी विभाग), देवराम कारभारी सदगीर (सॅनीटेशनविभाग), बाळासाहेब रामभाऊ खरात (केनयार्ड विभाग) राजेंद्र साहेबराव देशमुख (लेखा विभाग), कैलास राधाकृष्ण आवारी(सुरक्षा विभाग), धोंडु मल्हारी कोकतरे (सुरक्षा विभाग), नामदेव दामोधर शेटे, (इंजिनिअरिंग विभाग), रामदास सीताराम सुर्यवंशी (इंजिनिअरिंग विभाग), शिवनाथ भिकाजी नवले (इंजिनिअरिंग विभाग), विठ्ठल मुक्ताजी देशमुख (रसायन विभाग), बाळासाहेब भगवंत देशमुख (स्टोअर विभाग), सुभाष कमळू महाले (शेतकी विभाग), भाऊसाहेब भिकाजी एखंडे (लेखा विभाग) हे कर्मचारी सेवा निवृत्त होत आहे. त्यांनी आपली सेवा करताना आपल्या कामाची छाप पाडली असून त्यांच्या सेवा निवृत्ती निमित्त छोटेखानी निरोप समारंभ रविवार दि.१/६/२०२५ रोजी सकाळी १० वाजता अगस्ति कारखान्याच्या कार्यस्थळावर संपन्न होणार आहे. तरी सेवा निवृत्ती सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## लोखंडी पाईपने हॉटेल चालकास बेदम मारहाण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

टपरीचा पत्रा काढण्यासाठी चुलत भावास समजावून सांग, असे म्हटल्याचा राग आल्याने तिघांनी हॉटेल चालकासह त्याच्या कुटुंबातील महिलांना शिवीगाळ करीत लोखंडी पाईप, लाथाबुक्क्यानी बेदम मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना नगर तालुक्यातील खारेकर्जुने येथे शुक्रवारी (दि. २३) सकाळी नऊ वाजता घडली. याबाबत संभाजी अर्जुन मुळे (वय ४२ रा. खारेकर्जुने, ता.नगर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी मुळे यांचे खारेकर्जुने गावात वडापाव व नाष्ट्याचे हॉटेल आहे. त्याच्या शेजारी अविनाश तांबे याचे पंक्चरचे दुकान आहे. या दुकानाचा पत्रा फिर्यादीच्या हॉटेलसमोर आला होता. तो काढण्याबाबत त्यांनी तांबे यास अनेकदा सांगूनही त्याने तो काढला नव्हता. २३ मे रोजी तेथे अविनाशचा चुलत भाऊ पिनू अप्पासाहेब तांबे, बंटी बाळासाहेब तांबे, बबलू पिनू तांबे, (सर्व इसळक, ता.नगर ) हे बोलेरो गाडीतून आले. त्यावेळी फिर्यादीने पिनू तांबे यास तुझा चुलत भावास टपरीचा पत्रा काढून घेण्यास सांगितले.परंतु तो काढत नाही, त्या समजावून सांग. असे म्हटल्याचा राग आल्याने त्याने फिर्यादीस शिवीगाळ केली, तसेच तिघांनी बोलेरो गाडीतून लोखंडी पाईप काढून फिर्यादीस मारहाण सुरू केली. तो आरडाओरडा ऐकून फिर्यादीचे आई, वडील, पत्नी, बहीण, भाचा हे तेथे आले असता, त्यांना ही या तिघांनी लोखंडी पाईपने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीसह चंद्रकला अर्जुन मुळे, धनश्री शिवाजी मुळे, अर्जुन कारभारी मुळे, स्वप्निल टांगळ, संगीता टांगळ व मनीषा मुळे जखमी झाले. याप्रकरणी संभाजी मुळे यांनी दिलेला फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात पिनू तांबे, बंटी तांबे, बबलू तांबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पाथर्डीत मुख्याधिकाऱ्याच्या प्रतिकात्मक पुतळ्याला चिखलाने अभिषेक

### भूमिगत गटार योजना व प्रशासनाच्या गलथान कारभाराने रस्ते झाले चिखलमय झाल्याने आंदोलन

**● पाथर्डी । वीरभूमी –**

मागील १५ दिवस चालु असलेल्या अवकाळी पावसामुळे पाथर्डी शहरातील व उपनगरांमधील रस्त्याची अवस्था बिकट झाली असून याला जबाबदार शहरामध्ये सुरू असलेली भूमिगत गटार योजना व पालिका प्रशासनाचा भ्रष्टाचारी व गलथान कारभार असल्याचा आरोप करत आज शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी नाईक चौकात मुख्याधिकारी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास चिखलाने अभिषेक घालत आंदोलन केले.



यावेळी सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड, माजी नगरसेवक चांद मनियार, भाजपचे माजी शहराध्यक्ष नागनाथ गर्जे, सामाजिक कार्यकर्ते गोरख ढाकणे, आण्णा हारेर, मुन्नाभाई शेख, बब्बू बागवान, जुबेर मनियार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सर्व वक्त्यांनी स्थानिक प्रशासनावर व सुरू असलेल्या भुमिगत गटार योजनेच्या कामावर सडकून टीका केली. यावेळी प्रशासनास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाथर्डी शहरामध्ये नगर परिषदेकडून सुमारे २४१ कोटी रुपये खर्चाची भूमिगत गटार योजनेचे काम करत असताना ठेकेदाराने व अधिकाऱ्यांनी मनमानी करून पूर्वीचे असलेले चांगले सिमेंट काँक्रिटीकरण, खडीकरण व डांबरीकरण केलेले रस्ते मधोमध फोडल्याने सर्व रस्त्यांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात खड्डे व रस्ता चिखलमय झाला आहे. यामुळे पायी चालणे ही मुश्किल झाले आहे तर वाहनचालकांचे अपघात होत आहेत. तरी पावसाळा सुरू झाल्याने हे काम थांबवावे व ज्या ज्या ठिकाणी ठेकेदाराने गटार योजनेचे काम केले त्या कामांच्या ठिकाणी तात्काळ रस्ते दुरुस्त करण्यात यावेत व शहर चिखलमुक्त करावे तसेच शहरांमध्ये अनेक ठिकाणी गटारी तुंबल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्या त्रासामधून शहराची मुक्तता करावी व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी जर आगामी आठ दिवसांमध्ये आपण याबाबत कुठलीही कारवाई केली नाही किंवा रस्ते दुरुस्त करून पूर्ववत केले नाही तर आम्ही मुख्याधिकारी व पालिका प्रशासन विरोधात तिव्र आंदोलन करणार आहोत.

आजचे आंदोलन आम्ही शांततेच्या मार्गाने केले आहे मात्र पुढील आठ दिवसांमध्ये होणारे आंदोलन हे तीव्र स्वरूपाचे असेल असा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला आहे.

## नगरमध्ये अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करा; सह्याद्री छावा संघटनेची तक्रार

**● नगर । वीरभूमी –**

नगर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंग उभ्या राहिल्या असून, त्याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. विनापरवाना होर्डिंगच्या एजन्सीवर गुन्हा दाखल करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी करुन महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल करून मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.

सदर प्रकरणात त्वरीत कारवाई न झाल्यास ३० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संघटनेच्यावतीने उपोषण करण्यात येईल, असा इशारा प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी दिला आहे. नगर शहरातील अहिल्यानगर महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी सुरक्षा नियम धाब्यावर बसवून, विद्युत महावितरणच्या परवानगीविना अनधिकृत होर्डिंग उभारले गेले आहेत. हे होर्डिंग विद्युत तारांच्या अगदी जवळ उभे असल्याने विजेचा शॉक लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यापूर्वी अशाच प्रकारच्या एका होर्डिंगमुळे विजेचा धक्का लागून एका युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे असे प्रकार पुन्हा घडल्यास महापालिका आणि जाहिरात एजन्सींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संघटनेने केलेल्या आरोपानुसार, जाहिरात एजन्सींनी कामगार सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना राबवलेली नाही. त्यांच्याकडे खरे परवाने नसून बोगस कागदपत्रांवरच कामगार कार्यालयाकडून परवाने मिळवण्यात आले आहेत. या सर्व प्रकारात महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय हे शक्य नाही, असा ठपका ठेवत संघटनेने त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> पावसाळ्यात धोकादायक होर्डिंग नागरिकांच्या जीवावर उठले आहे. एखादी मोठी दुर्घटना होण्यापूर्वी अशा होर्डिंगवर व त्या जाहिरात एजन्सीवर कारवाई करणे अपेक्षित आहे. शहरात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत होर्डिंग यांना पेव फुटले असून, जाहिरात एजन्सी व मनपातील संबंधित अधिकारी यांची चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी.
>
> – **रावसाहेब काळे,** प्रदेश कार्याध्यक्ष, सह्याद्री छावा संघटना

## हिरवाईने नटलेल्या मोहटादेवी गडावर भाविकांची गर्दी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

रोहिणी नक्षत्र बरोबरच बिगर मोसमी पावसामुळे मोहटादेवी गडाचा परिसर अत्यंत रमणीय व प्रेक्षणीय बनून उंच डोंगरावरून हिरवाईने नटलेला परिसर बघण्यासाठी पर्यटकांसह भाविकांची मोठी गर्दी होत आहे.



श्रीक्षेत्र मोहटादेवी व वृद्धेश्वर परिसर डोंगरदऱ्यांनी नटलेला असून सततच्या पावसाने दोन महिने अगोदरच संपूर्ण परिसर हिरवाईने नटला आहे. हिरव्यागार डोंगरावर रेंगाळणारे ढग, अंगाला झोंबणारे थंडगार वारे, मधूनच सूर्यदर्शन, मधूनच आभाळ, तर लगेचच पावसाची जोरदार सर आशा वातावरणाने भाविक सुद्धा सुखावून जात आहेत. तारकेश्वर गड परिसर व येथून मोहटादेवीकडे येणाऱ्या रस्ता छोट्या ओढ्यांमधून खळखळ वाहणाऱ्या लालसर रंगाच्या पाण्यामुळे निरव शांतता भेदीत पाणी देवी मंदिरा मागील बंधाऱ्यामध्ये तर काही पाणी मोहरी तलावामध्ये जाते. जणूकाही निसर्ग आपल्याबरोबर बोलतो आहे असे चित्र मोहटादेवी गडाच्या परिसरात झाले असून सध्या लग्नसराई कमी झाल्याने व शालेय सुट्ट्यांमुळे पुणे, अहिल्यानगर, संभाजीनगर, बीड, कल्याण अशा भागातून येणाऱ्या निसर्ग पर्यटकांसह भाविकांची चांगली गर्दी होत आहे. निवास व्यवस्था, उत्तम सुरक्षा व मोफत महाप्रसाद सुविधा असल्याने निसर्गाशी बोलायलाच चला असा संदेश येथील येणारे पर्यटक परस्परांना देतात. अनेक भाविक डोंगरदऱ्यात फोटोग्राफी मध्ये मग्न आहेत. साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर दिवसभर मंदिर व परिसराची स्वच्छता सुरू असते. महाबळेश्वर, पाचगणी अशा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याऐवजी मायंबा, वृद्धेश्वर, मोहटादेवी, तारकेश्वर गड अशा ठिकाणी सुद्धा तसेच वातावरण सध्या झाले आहे. पाथर्डी शेवगाव शिरूर कासार आष्टी पैठण नेवासे नगर सावेडी परिसर अशा पट्ट्यातून मित्रमंडळाच्या सहली सुद्धा येथे येऊन बचत गटाच्या महिला खास वाहनांद्वारे येथे एक दिवसाची सहल करण्यासाठी आवर्जून प्राधान्य देत आहेत. येथील व्यावसायिकांनी मान्सून स्पेशल मेनू मागणीप्रमाणे उपलब्ध करून देण्यासाठी तयारी पूर्ण केली आहे. यामध्ये गरमागरम भजी, मिसळ पाव, चुलीवरील भाकरी, चटकदार भेळ, पिठले भाकरी, गरमागरम भाजलेला चवदार खवा, अस्सल ग्रामीण पदार्थांची मागणी येथे वाढू लागली असून बागेत बसून, झाडाखाली बसून अथवा निसर्ग सानिध्यात बसून जेवणाची सुविधा व्यावसायिकांनी उपलब्ध करून दिली आहे. मऊशार गवत, तजेला धरून चकाकणारी झाडे झुडपे, पशुपक्ष्यांचा किलबिलाट तर अति निर्मनुष्य भागात गेले तर मधूनच पळणारे ससे, हरीण अथवा अन्य वन्यजीव सुद्धा दृष्टीस पडतात. सध्या भाविकांची पर्यटनाच्या दृष्टीने मोहटादेवी गडावर गर्दी वाढत आहे. लहान मुलांना खेळण्यासाठी प्रशस्त असे मैदान असल्याने पालकांचीही ओढ देवीगडाकडे आहे. मंदिरापर्यंत थेटपणे वाहने नेण्याची सुविधा व ज्येष्ठांसाठी लिफ्टची सुविधा असल्याने सुरक्षितपणे गडावर पोहोचता येते. सकाळ सायंकाळ होणाऱ्या आरतीसाठी सुद्धा भाविक गर्दी करतात. पर्यटनाच्या दृष्टीने सध्या गडाचा परिसर अत्यंत रमणीय बनला असून भाविकांनी अशा वातावरणामध्ये आवर्जून भेट द्यावी असे आवाहन विश्वस्त मंडळाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे व जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांनी केले आहे.

# वीर जवान संदीप गायकर यांना अकोलेत अभिवादन

### रोटरी क्लब ऑफ अकोले सेंट्रल व केमिस्ट, मेडिकल असोसिएशनचा पुढाकार

**● अकोले । प्रतिनिधी–**

अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथील वीर जवान संदीप गायकर यांना सकाळी बस स्थानक अकोले येथे रोटरी क्लब सेन्ट्रल, अकोले तालुका केमिस्ट व मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी अमर रहे अमर रहे, वीर जवान संदीप गायकर अमर रहे, भारत माता की जय, वन्दे मातरम् च्या घोषणांनी परिसर दुमदुमन गेला होता.

यावेळी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ड. के. डी. धुमाळ, वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. वसंतराव मनकर, माजी नगराध्यक्षा सोनालीताई नाईकवाडी, रोटरी क्लबचे पब्लिक इमेज डायरेक्टर हभप. दिपक महाराज देशमुख, रोटरी क्लबचे अमोल वैद्य, माजी अध्यक्ष सचिन आवारी, सचिन देशमुख, सुनील नवले, माजी अध्यक्ष डॉ. रवींद्र डावरे, सेक्रेटरी अमोल देशमुख, उपाध्यक्ष दिनेश नाईकवाडी, सह सेक्रेटरी समीर सय्यद, गंगाराम करवर, रोहिदास जाधव, डॉक्टर देविदास नवले, डॉ. किरण पारधी, डॉ.प्रकाश वाकचौरे, डॉ. प्रतीक घोडके, भारत पिंगळे, सचिन आहेर, मयूर रासने, नवनाथ शेटे, दिनेश आहेर, विजय पावसे, माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सखाराम घनकुटे, सेक्रेटरी डॉ. जयसिंग कानवडे, ग्रामीण रुग्णालय अकोलेचे मेडिकल ऑफिसर डॉ.बाळासाहेब मेहेत्रे, केमिस्ट असो. अध्यक्ष राजेश धुमाळ, सेक्रेटरी महेश येवले, राजकुमार भळगट, रविंद्र कोटकर, रवी पूंडे, सुरेश आवारी, सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष भास्कर तळेकर, डॉक्टर अनुप्रिता शिंदे, डॉक्टर रमा कुलकर्णी, डॉ.सौ.पारधी, राजेंद्र नाईकवाडी, शाहीर मुकुंदा भोर, अनिल कोळपकर, भाऊसाहेब चासकर, प्राचार्य सुनील चौधरी, भाऊसाहेब नाईकवाडी, प्रशांत चौधरी, दत्ता धुमाळ आदिसह विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या आजी-माजी सैनिक संघटनेचे सदस्य, रोटरी क्लब अकोलेचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, अकोले तालुका केमिस्ट व मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य यांचे सह  शहरातील व्यापारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रास्ताविक व सूत्रसंचालन रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष व मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष अमोल वैद्य यांनी केले. यावेळी अकोले तालुका सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष भास्कर तळेकर, हभप. दीपक महाराज देशमुख, सौ. सोनाली नाईकवाडी, डॉ. अनुप्रिता शिंदे, डॉ. रवी गोर्डे, प्रमोद मंडलिक आदींनी मनोगत व्यक्त करताना वीर जवान संदीप गायकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लब चे अध्यक्ष प्रा. विद्याचंद्र सातपुते, सेक्रेटरी अमोल देशमुख, सचिन देशमुख, सचिन आवारी, दिनेश नाईकवाडी यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.

SPOT NEWS



## नागरी समस्यांबाबत पालकमंत्री यांना निवेदन

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

प्रभाग क्र. ११ मधील नागरी समस्या आरोग्य संदर्भात व विद्युत महावितरण संदर्भात तसेच प्रभाग क्रं ११ मधील कोठी व गुलाबसिंग कंपाऊंड येथे पावसाच्या पाणी संदर्भात उपाययोजना करण्याबाबत कोठी व मार्केट यार्ड दरम्यान जड वाहतूक बंद करण्याबाबत तसेच परिसरातील रस्त्या संदर्भात व प्रभाग क्रं.११ मधील रस्त्यावरील खड्डे बुजवन्यात यावे व स्ट्रीट पोल लाईट लावण्यात यावे तसेच अतिक्रमण विभागाने नोटीस न देता गोरगरिबांचे राहती घरे तोडली यावरती कारवाई करण्यात यावी अशा विविध मागण्यांसंदर्भात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे समवेत नागरिक उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, कोठी परिसरामध्ये आरोग्य विभागाचे कर्मचारी वारंवार कामचुकारपणा करतात व रस्त्यावरील कचरा हाही उचलला जात नाही तसेच कोठी व गुलाबसिंग कंपाउंड परिसरात घंटागाडी सुरू करावी तसेच धार्मिक स्थळ समोरील कचरा वेळेवर उचलत नसल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे व विद्युत महावितरण यांच्या कार्यालय हे सारखी विद्युत प्रवाह बंद करतात तेव्हा नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते त्यामुळे विद्युत प्रवाह सुरळीत करण्यात यावा व कोठी ते मार्केट यार्ड दरम्यान जड वाहतूक बंद करण्यात यावे या रस्त्यावर लहान मुले व ज्येष्ठ नागरिक पायी ये-जा करतात त्यामुळे कोणताही अपघात होण्याची शक्यता आहे तसेच इंदिरानगर रोड तसेच इंदिरानगर झोपटपट्टी येथील गोरगरिबांचे राहते घर पालिकेने कोणतीही नोटीस न देता कारवाई करण्यात आली तसेच या प्रभाग क्रं.११ विविध परिसरामध्ये पावसाचे पाणी घरामध्ये शिरत असल्याने परिसरात ठोस उपाय योजना करण्याची मागणी केली.

### निमगाव वाघात दहावीतील गुणवंतांचा गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयाच्या इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी एसएससी बोर्डाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत गावाचे नाव उज्वल केले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव करण्यात आला. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, पै. अनिल डोंगरे, भरत बोडखे, लक्ष्मण चौरे, दत्ता फलके, बबन जाधव, दत्ता लोखंडे, सचिन कापसे, चंद्रकांत जाधव, सुरेश जाधव, अनिल आनंदकर, हरिदास फलके, सचिन जाधव, युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, सुभाष खळदकर, नवनाथ हारदे, भाऊसाहेब फलके, हिराबाई फलके, सोमनाथ खांदवे, रामदास जाधव, भास्कर उधार आदींसह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात अतिवृष्टीने जनजीवन विस्कळीत

## आठवडाभरापासून नित्याचा पाऊस । मे महिन्यातच रेकॉर्ड ब्रेक पाऊस

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यात श्रीगोंदा तालुक्यात जोरदार सरींसह आठवड्यातील आंबोलीसम पावसाने चक्का जाम केला आहे. गेल्या तीन दिवसांपासून तालुक्यात संततधार, मुसळधार पाऊस पडत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. मे महिन्यात श्रीगोंदा तालुक्यात सरासरी २३.७ मिमी पाऊस असतो तर यंदा कधी नव्हे ते मे महिन्याच्या सरासरीपेक्षा २९४.६ मिमी पाऊस बरसल्याने अखबा पावसाळ्याच्या निम्मा पाऊस मे महिन्यातच पडत आहे. अजूनही हवामान खात्याने ३० मे पर्यंत पाऊस पडण्याची शक्यता सांगितल्याने व मान्सूनचे कोकणात आगमन झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे गार वातावरण पसरले आहे.



मे महिन्याच्या सरासरीपेक्षा १२ पट पाऊस बरसल्याने श्रीगोंदा तालुक्यात कोकणसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याला अवकाळी म्हणायचे का पूर्व मोसमी म्हणायचे का अंदमान निकोबार मार्गे पूर्वे कडून आलेला मान्सून म्हणायचे या संभ्रमात सामान्य जनताच काय तर हवामान खातेही पडले आहे. या अतिवृष्टीचा पेरभरणी केलेला शेतकरी, दैनंदिन कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांवर मोठा परिणाम होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे..

श्रीगोंदा तालुक्यात १ मे पासूनच अवकाळी पावसाचे आगमन झाले. लवकरच अंदमान निकोबरला पोहोचलेल्या मान्सूनने पूर्वेकडून महाराष्ट्रात हजेरी लावली. गेल्या आठ दिवसात पावसाने पूर्व मोसमी हजेरी लावल्याने मंगळवारपासून (दि. २२ मे) संततधार पावसाला सुरुवात झाली. शुक्रवार व शनिवारी तालुक्यात सरासरी ८५ मिमी पाऊस पडला तर रविवारी २५ मे रोजी रेकॉर्ड ब्रेक ५७.५ मिमी च्या पुढे पाऊस पडल्याने व प्रचंड वृष्टी झाल्याने नद्या, ओढे, नाल्यांना पाणी वाहू लागले आहे. अनेक ठिकाणी शेत, खड्डे व खोलगट भाग, नद्या, ओढे, नाले पाणी साचून वाहू लागले आहे. श्रीगोंदा शहरात तर ढगफुटी सदृश्य पाऊस पडला.

या अवकाळी किंवा पूर्वेकडून आलेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. अनेक शेतकऱ्यांची कांदा, उन्हाळी भुईमूग व इतर पिकांचे नुकसान झाले आहे. मे महिन्यात कापूस, बाजरी आणि इतर खरीप पिकांच्या पेरणीपूर्वीच्या कामांना वेग आला असताना, या पावसाने शेतकऱ्यांची तयारी खोळंबली आहे. काही शेतकऱ्यांनी पेरणी केलेली पिके पाण्याखाली गेल्याने नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, काढणीला आलेल्या कांदा, फळबागा आणि इतर भाजीपाला पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

संततधार पावसामुळे दैनंदिन कामगार, शेतकरी, छोटे व्यावसायिक आणि दुकानदारांवर विपरीत परिणाम झाला आहे. श्रीगोंदा शहरातील रस्त्यांवर आधीच खड्डे त्यात पाणी साचल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान तर नागरिकांचे हाल झाले आहेत. तसेच, ग्रामीण भागातील कच्च्या रस्त्यांवर चिखल झाल्याने वाहतूकीत अडथळे निर्माण झाले आहेत. दौंड - नगर रस्त्यावर दौंड येथील नगरमोरी वाहू लागल्याने राष्ट्रीय मार्गावरील वाहतूक खोळंबून वाहनांच्या कित्येक किलोमीटर रांगा लागल्या होत्या. अनेक ठिकाणी पाणीपुरवठा आणि अनेक गावात वीजपुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तर सुटलेल्या कुकडी कालव्याकडे कुणी ढुंकूनही पाहत नाही.

### रविवारी पडलेला पाऊस

■ रविवार दि. २५ मे रोजी तालुक्यात मंडळनिहाय पाऊस मिलिमीटरमध्ये श्रीगोंदा - ५८, काष्टी - ५४.८, बेलवंडी- ४१.५, पेडगाव - ९४, चिंभळा-३६.५, देवदैठण- ७६.५, लोणी व्यंकनाथ - ३५.५, भानगाव - ८२.८, आढळगाव -८२.८ मिमिमीटर पाऊस पडला आहे.

## इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

**श्रीगोंदा । प्रतिनिधी–**

बेलवंडी शुगर येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये महालक्ष्मी ऑटोमोटिव्ह प्रा. लि. कंपनीतर्फे नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात तृतीय वर्षातील मेकॅनिकल इंजिनीअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर इंजिनीअरिंगच्या २७ विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच कंपनीने नोकरीची संधी उपलब्ध करून दिली.

कंपनीचे एचआर अमोल ढवळे, टेक्निकल हेड अक्षय चव्हाण आणि त्यांच्यासोबतच्या प्रतिनिधींनी तीक्ष्ण निवड प्रक्रियेद्वारे योगेश पंधरकर, सताक्षी लगड, माधुरी शिंदे, तेजस्विनी रायकर, वैष्णवी खामकर, प्राची भोसले, रुतिका कातोरे, सानिका देशमुख, तनुजा पंधरकर, प्रगती पंधरकर, सानिका शिंदे, एकता शिंदे, प्रियंका सोनवणे, शुभांगी शिंदे, तनुजा थिटे, वैष्णवी लबडे, ऋतुजा मोळक, साक्षी देवीकर, सजरन खान, ऋषिकेश शिंदे, अभय शिंदे, सुयश शिंदे, सुरज भोसले, अमीर शेख, वैभव दळवी, ऋषिकेश इथापे आणि प्रज्वल झराड यांची थेट मुलाखतीद्वारे निवड केली.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस, सर्व संचालक मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, प्राचार्य प्रशांत भोईटे, विभाग प्रमुख प्रा. ए. आय. हवालदार, प्रा. एस. नातू, प्रा. पी. एस. इथापे, प्रा. एम. एन. शिंदे, प्रा. एस. एस. साळवे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## वृद्धाश्रमातील आजी - आजोबांना मिष्ठान्न भोजन व वस्त्रदान

**शेवगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील सामनगाव येथील हरहुन्नरी छायाचित्रकार व पत्रकार सचिन सातपुते यांनी आपले दिवंगत वडील सर्जेराव मार्तंड सातपुते यांचे स्मृतिदिनानिमित्त शेवगावच्या गुरुदत्त सामाजिक संस्था संचलित योगतज्ञ प. पू. दादाजी वैशंपायन वृद्धाश्रमातील १५ आजी - आजोबांना मिष्ठान्न भोजन प्रसादाबरोबरच वस्त्रदान करून समाजापुढे नवा आदर्श ठेवला आहे.



श्री. सातपुते यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे गुरुदत्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे तसेच श्रीदत्त देवस्थान साधक समूह व दत्त भक्तांनी कौतुक व अभिनंदन केले आहे. गुरुदत्त सामाजिक संस्थेमार्फत शासनाच्या अनुदानाशिवाय सेवाभावी वृत्तीने वृद्धाश्रम चालविला जातो. त्यासाठी दैनंदिन खर्च मोठा आहे. दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संघटना, सेवाभावी संस्था तसेच समाजातील घटकांनी वैयक्तिकरित्या पुढे येऊन किराणा सामान, धान्य, वस्तू व आर्थिक योगदान देऊन या सत्कार्यास हातभार लावावा, असे आवाहन श्री. सातपुते यांनी केले आहे.

## पाण्यात बुडून मृत्यूमुखी पडलेल्या चिमुकल्यांच्या कुटुंबाचे आ. आशुतोष काळेंनी केले सांत्वन



**कोपरगाव । वीरभूमी–**

काही दिवसापूर्वी कोपरगाव तालुक्यातील काकडी मल्हारवाडी येथील डोशी कुटुंबातील सख्या भावा-बहिणीचा पाण्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या चिमुरड्यांच्या कुटुंबाची आ.आशुतोष काळे यांनी भेट घेवून घडलेल्या घटनेची माहिती जाणून घेवून डोशी कुटुंबाचे सांत्वन केले.

मल्हारवाडी शिवारातील प्रशांत डोशी यांचा मुलगा साहिल प्रशांत डोशी (वय वर्ष १२) हा चिमुकला तळ्यात पाणी आणण्यासाठी खोदण्यात आलेल्या नालीत पोहण्यासाठी गेला होता. परंतु पाण्याच्या अंदाज न आल्यामुळे वाहत जात तो तळ्यात बुडू लागला असता त्याची बहिण दिव्या प्रशांत डोशी (वय १५) हि साहिलला वाचविण्यासाठी गेली. परंतु पाण्याच्या अंदाज न आल्याने या दोघाही बहिण-भावाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या दुःखद घटनेबाबत आ.आशुतोष काळे यांनी डोशी कुटुंबीयांची भेट घेवून शोक व्यक्त केला. सदर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी व वेदनादायक आहे. या चिमुकल्याच्या जाण्याने डोशी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले. अनेक गावात कालव्याचे पाण्यातून पाझर, तलाव, बंधारे भरलेले आहेत व शाळांना देखील सुट्टीचे दिवस आहेत. त्यामुळे नागरीकांनी आपल्या मुलांची काळजी घ्यावी असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे.

यावेळी कर्मवीर काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रविण शिंदे, बाळासाहेब शिंदे, आण्णापाटील रानोडे, चांगदेव डांगे, नामदेव रानोडे, अर्जुन रानोडे, सिताराम रानोडे, बाबासाहेब रानोडे आदी उपस्थित होते.

# भंडारदरा फाटा-मुतखेल ते साम्रद रिंग रोडच्या निकृष्ट दर्जाच्या कामावर ग्रामस्थांचा संताप

### आंदोलन व उपोषणाचा इशारा

**अकोले । वीरभूमी–**

भंडारदरा फाटा ते मुतखेल, कोलडेंभे आणि साम्रद या आदिवासी भागातील रिंग रोड काँक्रीटीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, कामात गुणवत्ता नसल्याने ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी आंदोलन व उपोषणाचा इशारा देत संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून या रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असून, ठेकेदार कामात मनमानी करत असल्याचे आरोप झाले आहेत. यासंदर्भात स्थानिक सरपंच अनंत महादू घाणे व सर्व अधिकारी यांना निवेदन दिले आहे.



राजूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची ठेकेदारांवर असलेली 'मेहेरबानी' हीच या निकृष्ट कामामागील मुख्य कारण असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. अधिकारी वारंवार तक्रार करूनही दुर्लक्ष करत असल्याने स्थानिक पातळीवर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

माजी आमदार वैभव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली अनंत महादू घाणे, तुकाराम खाडे, सरपंच एकनाथ सारुक्ते, सरपंच गोविंद साबळे, सदस्य तुकाराम सारुक्ते, सागर रोंगटे, बुंधा पाटील, सरपंच बांडे, पांडु उघडे सह अन्य ग्रामस्थांनी प्रत्यक्षस्थळ पाहणी केली. त्यावेळी अनेक ठिकाणी पीसीसी (प्लेन सीमेंट काँक्रीट) न करता थेट माती मिश्रित माल टाकण्यात आलेला दिसून आला. पावसात टाकलेला माल वाहून गेला असून, कोलटेंभे भागात वाशसँड आणि माती मिश्रीत खडी वापरण्यात आल्याचे प्रत्येक्ष अनंत घाणे, तुकाराम खाडे, गोविंद साबळे सह ग्रामस्थांना दिसून आले. सिमेंट ऐवजी चिखला सारखा माल वापरून रस्ता तयार केला जात असल्याने रस्त्याचे आयुष्य धोक्यात आले आहे.

यावेळी ना ठेकेदार उपस्थित होते, ना सार्वजनिक बांधकाम विभाग राजूरचे अधिकारी यांची कामावर कुठलाही देखरेख नसल्यामुळे ठेकेदारांचे कामगार आपली मनमानी सुरू ठेवून निकृष्ट दर्जाचे काम करत असल्याचे निदर्शनास आले. चौकशी समिती करुन कामात हलगर्जीपणा करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी तसेच ज्या ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाची कामे केली आहेत, त्यांची सखोल चौकशी करून त्यांच्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी सरपंच सदस्य व केली आहे. ग्रामस्थांनी वारंवार सूचना करूनही कामात सुधारणा होत नसल्यामुळे आता हा मुद्दा अधिक गांभीर्याने घेतला जात असून, लवकरात लवकर कामाच्या गुणवत्तेत सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन व उपोषण करण्यात येईल, असा इशारा मुतखेल, कोलटेंभे, रतनवाडी, साम्रद ग्रामस्थांनी दिला आहे.

# जिल्ह्यातील दिंड्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । दिंडीच्या नोंदणीसाठी प्रत्येक तहसील कार्यालयात स्वतंत्र कक्ष

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
जिल्ह्यातील दिंडी सोहळ्याचे प्रमुख, वारकरी व प्रशासन यांच्यातील योग्य समन्वयातून जिल्ह्यातील दिंड्याना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, या मंगलमय उत्सवातून हरीतवारी निर्मलवारीचा संदेश मिळेल असा प्रयत्न करण्याचे आवाहन करतानाच, वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी दिंड्याची नोंदणी तहसिल कार्यालयात करण्यासाठी स्वतंत्र कक्ष सूरू करण्याची सूचना त्यांनी जिल्हा प्रशासानातील अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आषाढी वारी नियोजन बैठकीत पालकमंत्री श्री.विखे पाटील बोलत होते. याप्रसंगी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, ह.भ.प. अशोक सावंत आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, आपल्या जिल्ह्यातून २६० दिंड्या करमाळा मार्ग सोलापूर जिल्ह्यात मार्गस्थ होतात. संत निवृत्तीनाथ पालखी मार्ग निर्हेण ते शेगुड पर्यंत रस्त्यांचे खड्डे बुजविण्यात यावे. साईड पट्ट्या दुरूस्त कराव्यात. दिंडी मार्गावरील पारेगाव येथे मुलभूत सुविधा पुरवाव्यात. संपूर्ण पालखी मार्गावर रूग्णवाहिका तयार ठेवण्यात यावेत. दिंड्याच्या नोंदणीसाठी प्रत्येक तहसील कार्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावे.

यावर्षी पालखीच्या सुरूवातीलाच पाऊस होत आहे, त्यामुळे वारकऱ्यांची सुरक्षा म्हणून यापुढे पावसाचे अंदाज वर्तविणारी अद्यावत यंत्रणा उभारण्यात येणार आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या २६० दिंड्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनातील अधिकारी – कर्मचाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक दिंडीत पुरेसे औषधे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिली.

श्री.विखे पाटील म्हणाले, ज्या गावात अथवा शहरामध्ये या दिंड्या मुक्कामी थांबणार आहेत त्या ठिकाणच्या शाळा, महाविद्यालय, मंगल कार्यालयामध्ये वारकऱ्यांची मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार असून त्याठिकाणी शुद्ध पिण्याचे, पाणी, अखंडितपणे वीज, आरोग्य व शौचालयाची व्यवस्थाही केली जाणार आहे. मागील वर्षीच्या दिंडीतील वारकऱ्यांच्या अडचणी यावर्षी दूर केल्या जातील. वारकऱ्यांच्या सूचनांची दखल घेतली जाईल.

वारकरी पायी चालत असलेल्या मार्गावर वाहतुकीचे नियमन करण्याबरोबरच वारकऱ्यांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी दिंड्यासोबत पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. दिंड्या ज्याठिकाणी मुक्कामी राहतील तेथेही पोलीस कर्मचारी उपस्थित राहतील दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पालखीमार्गावर आवश्यक साधनांसह तात्पुरते आरोग्य केंद्र उभारण्यात यावे, श्रीक्षेत्र नेवासा येथील ज्ञानेश्वर देवस्थानाचा ७०० कोटींचा विकास आराखडा तयार केला जाणार आहे. मागील वर्षाप्रमाणे यावर्षी प्रत्येक दिंडीला २० हजार रूपये अनुदान व प्रत्येक वारकऱ्यास पाच लाख रूपयांचा विमा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचे त्यांनी सांगितले.




अनेकवेळा मुक्कामाच्या ठिकाणी अशुद्ध पाणी पिल्याने अनेक वारकरी आजारी पडतात. त्यामुळे प्रत्येक दिंड्यातील वारकऱ्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. ज्या दिंड्याकडे स्वतःचे पाणी टँकर आहेत, त्यांच्या टँकरमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी भरून देण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या. दिंडीमध्ये अस्वच्छता होऊ नये यासाठी 'हरित वारी – निर्मल वारी' उपक्रम राबविण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

आमदार शिवाजीराव कर्डीले, आ.विठ्ठलराव लंघे, आ.अमोल खताळ यांनीही वारीच्या नियोजनाच्या दृष्टीने सूचना केल्या. याबैठकीला जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील ७६ दिंडीचे प्रमुख तसेच वारकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

# शहिद जवान गायकर कुटुंबाचे मंत्री उदय सामंत यांचेकडून सांत्वन

## शिवसेनेच्या वतीने गायकर कुटुंबियांना ५ लाखाची आर्थिक मदत

**● अकोले । प्रतिनिधी–**
जम्मू काश्मिर मध्ये दहशतवादी हल्ल्यात अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील वीर जवान संदीप गायकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, काल शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर ब्राम्हणवाडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

राज्याचे उद्योग मंत्री नामदार उदयजी सामंत यांनी गायकर कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली. शिवसेना परिवार हा वीर जवान शहीद संदीप गायकर यांच्या कुटुंबाच्या पाठीशी भक्कम उभा राहील, असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेनेच्या वतीने शहीद जवान संदीप गायकर यांच्या कुटुंबाला ५ लाखाची मदत देण्यात आली.

या प्रसंगी जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे, संगमनेरचे आमदार अमोल



खताळ पाटील, शिवसेनेचे सचिव राम रेपाळे, उपजिल्हाप्रमुख मारुती मेंगाळ, तालुकाप्रमुख सुशांत गजे, सहसचिव सुभाषराव येवले, अकोले शहराध्यक्ष सचिन शेटे, अकोले शहर कार्याध्यक्ष जावेद जहागिरदार, कांताराम मेंगाळ, बाळासाहेब भोर, उपतालुकाप्रमुख गणेश पापळ, युवासेना जिल्हा प्रमुख महेश देशमुख, विशाल गोंदके, वैभव गोंदके, सुभाष गायकर पाटील, अक्षय आरोटे, पोपट मेंगाळ आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार अनिल खाटेर यांना लोककला साहित्यिक परिषदेचा 'पत्रकार भुषण' पुरस्कार जाहीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**
दैनिक वीरभूमीचे पाथर्डी तालुका प्रतिनिधी युवा पत्रकार अनिल खाटेर यांना श्रीरामपूर येथील लोककला साहित्यिक परीषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा 'पत्रकार भुषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. येत्या १ जुन रोजी होणाऱ्या संत ज्ञानेश्वर साहित्य संमेलनात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही घोषणा केली आहे.



याबाबत अनिल खाटेर यांना पत्र पाठवून पत्रकार भुषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याचे कळवले आहे. श्री. खाटेर हे अनेक वर्षांपासून पत्रकार म्हणुन काम पहात आहेत. पत्रकारितेबरोबरच सांस्कृतिक, सामाजिक, जनजागृती विषयक कार्याची दखल घेत त्यांनी पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

पत्रकारिता क्षेत्राबरोबरच धार्मिक क्षेत्रातील संत ज्ञानेश्वर पुरस्कार हभप. अमोल महाराज सोळसे व हभप. भागवत महाराज मरकड यांना तर सामाजिक क्षेत्रातील समाजभूषण पुरस्कार संभाजीराव बडे तर साहित्य क्षेत्रातील पुरस्कार कवी रूपचंद शिदोरे यांना जाहीर झाला आहे.

पत्रकार अनिल खाटेर, अमोल महाराज सोळसे व इतरांना हा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे पाथर्डी तालुक्यातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# मणिपाल हॉस्पिटलमध्ये प्रिसिजन रेडिओ सर्जरी यशस्वी

## अत्याधुनिक रेडिओसर्जरी मुळे रिलॅप्स्ड एव्हीएम रुग्णांना मिळाली नवी आशा

**● पुणे । वीरभूमी–**
वर्षीय मेंदूतील रिलॅप्स्ड आर्टेरिओव्हेनस मालफॉर्मेशन (एव्हीएम) ने त्रस्त असलेल्या रुग्णाला पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये यशस्वी उपचार करण्यात आले, हे उपचार करण्यासाठी स्टिरिओटॅक्टिक रेडिओसर्जरीचा वापर करण्यात आली. मेंदूच्या अगदी जटील ठिकाणी आणि ज्या ठिकाणी पूर्वी म्हणजे २०२१ मध्ये करण्यात आलेल्या गॅमानाईफ सर्जरीची जागा पुन्हा खुली झाल्याने ही सर्जरी खूपच जटील बनली होती. एव्हीएम म्हणजे मेंदूतील गुंतलेल्या रक्तवाहिन्या असतात, ज्या मेंदूच्या महत्त्वाच्या भागात निर्माण होतात ज्यामुळे मेंदूचे कार्य बाधित होते, परिणामी परंपरागत न्युरोसर्जरी करणे कठीण होते.

आर्टिओव्हेनस मालफॉर्मेशन (एव्हीएम) ही अशी वैद्यकीय अवस्था आहे ज्यामध्ये रक्तवाहिन्यांमधील नैसर्गिक प्रवाहाचे व्यवस्थापन विस्कळीत होते. यात धमण्या आणि शिरांमधील कनेक्शन छोट्या, अपरिपक्व आणि कमकुवत रक्तवाहिन्यांद्वारे होतो, जे सहज फुटण्याची शक्यता असते. ही स्थिती मेंदूतील तसेच शरीराच्या इतर कोणत्याही भागातील रक्तवाहिन्यांमध्ये निर्माण होऊ शकते. एव्हीएममुळे रक्तस्त्राव होण्याची शक्यता वाढते आणि विशेषतः मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाल्यानंतरच याची लक्षणे दिसून येतात. अशा रक्तस्त्रावामुळे मेंदूमध्ये एक गाठ निर्माण होते, जी काही वेळा धोकादायक ठरू शकते. या गाठीमुळे मेंदूतील संबंधित भागावर परिणाम होऊन अर्धांगवायू होण्याची शक्यता असते. एव्हीएमच्या उपचारामध्ये मुख्यतः शस्त्रक्रियेच्या माध्यमातून ती गाठ काढून टाकली जाते. काही प्रकरणांमध्ये रेडिएशन थेरपीचा वापर करून ती गाठ लहान केली जाते किंवा पूर्णतः नष्ट केली जाते. तसेच, एम्बोलायझेशन या प्रक्रियेचा वापर करून विशेष साहित्याच्या साहाय्याने रक्तप्रवाह अडवून एव्हीएमच्या वाढीस प्रतिबंध केला जातो.

या केस विषयी पुण्यातील बाणेर येथील कन्सल्टंट रेडिएशन ऑन्कोलॉजी डॉ. करण चंचलानी यांनी सांगितले सबमिलीमिटरच्या अचूकतेने संपूर्ण ट्रिटमेंट डोस एकाच सेशन मध्ये देण्यात आला आणि यासाठी अचूक प्लॅनिंग केल्यानंतर असे दिसून आले की तिथे पूर्वी गॅमानाईफ उपचार झाला होता व तो प्लान अयशस्वी झाल्याचेही आढळून आले होते. यामुळे ही गोष्ट खूपच आव्हानात्मक होती कारण एव्हीएम हा मेंदूच्या अशा ठिकाणी होता ज्यामुळे सर्जरी झाल्यानंतर न्युरोलॉजिकल समस्या, आंधळेपणा, अर्धांगवायू अशा निर्माण होण्याची शक्यता होती म्हणूनच त्यासाठी उपचारांच्या मागील अपयशाची कारणे सुनिश्चित करण्यासाठी आम्ही सर्वसमावेशक एमआरआय नंतर टीओएफ सिक्वेन्सेस आणि डिजिटल सब्स्ट्रॅक्शन अँन्जिओग्राफी करुन एव्हीएम चा अभ्यास करण्यात आला. रुग्णावर हाय प्रिसिजन स्टिरिओस्टॅटिक रेडिओ सर्जरी करण्यात आली. ज्यामध्ये रेडिएशनचा अधिकचा डोस हा सब मिलिमीटर अचूकतेने अगदी थोड्या काळात देण्यात आला. अगदी महत्त्वाची बाब ही की ही प्रक्रिया नॉन इन्व्हेझिव्ह असून एसआरएस फ्रेमलेस सिस्टमचा वापर करण्यात आला. प्रक्रियेनंतरचा काळ हा सोपा होता, आता रुग्ण स्थीर, उपचारांना प्रतिसाद देऊन त्याची तब्येत सुधारत आहे.

मणिपाल हॉस्पिटल पुणे, बाणेरचे हॉस्पिटल डायरेक्टर आनंद मोटे यांनी सांगितले, मणिपालमध्ये रुग्णांच्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत मदत करणारी अचूक शस्त्रक्रिया क्षमता उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. आम्ही रुग्णांच्या हितासाठी तंत्रज्ञानातील प्रगतीवर नेहमीच भर देतो, ज्यामुळे AVM² (आर्टेरिओव्हेनस मालफॉर्मेशन) आणि इतर क्लिष्ट आजारांचे प्रभावी व्यवस्थापन शक्य होते.

# आगामी काळातील निवडणुकांमध्ये गुलाल आपलाच असेल

## युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांचा विश्वास । वारी येथे किसनराव गोर्डे यांचा नागरी सत्कार

**● कोपरगाव । वीरभूमी –**
भारतीय जनता पार्टीच्या कोपरगांव तालुकाध्यक्षपदी विशाल किसनराव गोर्डे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल वारी पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने भव्य नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम वारी येथील जगदंबा माता मंदिरा जवळील सभागृहात सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी विशाल किसनराव गोर्डे यांचा सत्कार करून त्यांना भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणांना तळागळापर्यंत घेऊन जाण्यासाठी पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

या सत्कार समारंभात भाजप ज्येष्ठ नेते शरदनाना थोरात, माजी सभापती एम. एस. टेके, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती साहेबराव रोहोम, औद्योगिक वसाहत उपाध्यक्ष केशवराव भवर, युवा मोर्चा मा. तालुकाध्यक्ष विक्रम पाचोरे, संचालक बापूसाहेब बारहाते, सुरेशभाऊ जाधव,



विष्णुपंत क्षिरसागर, सरपंच प्रदीप चव्हाण, डॉ. सर्जेराव टेके, अ‍ॅड. अमोल टेके, सरपंच अनुराग येवले, सरपंच जयराम वारकर, रेवनशेठ निकम, प्रकाश गोर्डे, फकिरराव बोरनारे, दिव्यांग सेल अध्यक्ष मुकुंद काळे, युवा मोर्चा शहराध्यक्ष सिद्धार्थ साठे यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोपरगांवसह वारी, कान्हेगांव, संवत्सर, कोकमठाण, सडे, भोजडे, धोत्रे, खोपडी, तळेगांव मळे, लौकी, घोयेगांव, उक्कडगांव या परिसरातील अनेक गावांतील सहकारी, कार्यकर्त्यांनी या सत्कार सोहळ्याला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रसंगी मच्छिंद्र पा. टेके यांनी स्व.शंकरराव कोल्हे यांच्या आठवणींना उजाळा दिला व गोर्डे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कांगोरे व्यक्त केले.

या प्रसंगी शुभेच्छा देताना विवेकभैय्या कोल्हे म्हणाले विशाल गोर्डे याची नावाप्रमाणे जगात सर्वात मोठा असणाऱ्या विशाल पक्षाच्या पदावर निवड झाली आहे. पंतपाधन नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मोठी जनविकासाची कामे मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी केली आहे. सामाजिक कार्य हा स्व.शंकरराव कोल्हे साहेब यांच्या पासून आपला पिंड राहील आहे. विशाल गोर्डे यांनी आजवर मला सातत्याने सामाजिक कार्यासाठी काळ वेळेचा विचार न करता संपर्क केला आहे. नागरिकांना कोरोना काळात वैद्यकीय मदत, पाणी प्रश्नात प्रयत्न, गोर गरिबांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचा आग्रह नेहमी असल्याने एक सामाजिक जाणीव असणाऱ्या नेतृत्वाला ही संधी मिळाली आहे. सेवा हाच धर्म ही आपली भावना असल्याने आगामी काळातील सर्व निवडणुकात गुलाल आपला असेल असे कोल्हे यावेळी म्हणाले.

कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी विशाल गोर्डे यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या असून, पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी त्यांचे नेतृत्व प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना विशाल गोर्डे यांनी पक्षनेतृत्वाने आणि युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी जी संधी दिली आहे ती कामाच्या रूपाने सोने करून दाखवेल असा विश्वास व्यक्त करत सर्वांची साथ आगामी काळात रहावी अशी अपेक्षा व्यक्त करून आभार मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com